महाराष्ट्र शासन
आयुक्तालय
वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष, मुंबई
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत, ४ था मजला, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी. डी. मेलो रोड, फोर्ट, मुंबई ४०० ००१
दुरध्वनी : 022-22620361-65 संकेतस्थळ : dmer.maharashtra.gov.in

क्र.आवैशिसंवआ/बी.ऑप्टोमेट्री/प्रवेश प्रक्रिया/२०२६ दिनांक : 26/11/2026

सुचना क्र.३

विषय : सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षातील बॅचलर ऑफ ऑप्टोमेट्री पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेबाबत...

संदर्भ : १. आयुक्तालय, वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष दिनांक ०४.११.२०२६ रोजीची नोटीस
२. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे दिनांक १६.११.२०२६ रोजीचे पत्र.
३. आयुक्तालय, वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष दिनांक २०.११.२०२६ रोजीची नोटीस
४. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे दिनांक २६.११.२०२६ रोजीचे पत्र.

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापठ, नाशिक यांच्याशी सलग्नित Bachelor of Optometry संस्थांची यादी आयुक्तालय, वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष विभागास विद्यापीठाच्या दिनांक १३.०८.२०२६ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झाली होती. सदरील यादीच्या अनुषंगाने संदर्भ क्रमांक १ रोजीच्या नोटीस अन्वये BACHELOR of Optometry अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरू करण्याबाबत संस्थाना कळविण्यात आलेले होते.

NCAHP (NATIONAL COMMISSION FOR ALLIED AND HEALTHCARE PROFESSIONS) यांच्यामार्फत अलीकडेच निर्गमित करण्यात आलेल्या नवीन मार्गदर्शक सूचना व त्यानुसार नियमांमध्ये करण्यात आलेल्या बदलांमुळे विद्यापीठाशी संलग्नित ALLIED HEALTH COURSES चालविणाऱ्या महाविद्यालयांना शैक्षणिक व प्रशासकीय स्तरावर विविध अडचणीबाबत विद्यापीठाशी संलग्नित संबंधित महाविद्यालयांच्या अधिष्ठाता/प्राचार्य/संचालक समवेत ऑनलाईन आढावा बैठक संदर्भ क्रमांक २ च्या पत्रान्वये आयोजित करण्यात आली होती.

तदनंतर आयुक्तालयाच्या संदर्भ क्रमांक ३ च्या नोटीस अन्वये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता Bachelor of Optometry संस्थांनी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापठ, नाशिक यांच्यामार्फत वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या सुचनेनंतरच प्रवेश प्रक्रिया राबविण्याबाबत बॅचलर ऑफ ऑप्टोमेट्री संस्थाना कळविण्यात आले होते. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापठ, नाशिक यांच्याद्वारे दिनांक २६.११.२०२६ रोजीच्या पत्रान्वये बॅचलर ऑफ ऑप्टोमेट्री अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरू करून प्रवेश प्रक्रियेचे ऑनलाईन पोर्टल सुरू केले आहे. तसेच सदरील अभ्यासक्रमाचे प्रवेश दिनाक ३०.११.२०२६ रोजी पर्यंत पुर्ण करण्याबाबत ऑप्टोमेट्री संस्थांना कळविले आहे.

उपरोक्त प्रकरणी कळविण्यात येत की, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी दिनांक २६.११.२०२६ रोजीच्या पत्रान्वये बॅचलर ऑफ ऑप्टोमेट्री अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया दिनांक ३०.११.२०२६ रोजी पुर्ण करण्याच्या अनुषंगाने ऑप्टोमेट्री संस्थांनी खालील प्रमाणे प्रवेश पात्रतेनुसार करण्यात यावी.

(A) Eligibility Criteria for Bachelor of Optometry for Academic Year 2026-27

1. The Candidate has passed Higher Secondary (10+2) with 50% marks with Physic, Chemistry and Biology group for open category and 40% marks for reserve category. The candidates must have pass English at HSC (10+2 Course). If sufficient number of eligible candidate are not available then eligibility of HSC (PCB) criteria may be relax subject to approval MUHS Nashik.
2. The candidate has attained the age 17 Years as on 31 December of the year of the admission.
3. The candidate has to furnish a certificate of Physical Fitness form registered Medical Practitioner at the time of admission.
4. The preference will be given to candidates who have passed 10th & 12th form Maharashtra and also domicile of Maharashtra. If such a candidate is not available the non-domicile of Maharashtra candidates will be admitted as mentioned in selection process.
5. 15% of seats Intake capacity will be filled by the institution as institutional quota seats.
6. 25% of seats of Intake capacity will be reserved for constitutional reserve candidates.
7. The Hostel accommodation will not be provided to admitted students.
8. Rules of Tie breaker HSC (10+2 Course) candidates –

(B) **Fee Structure :-**

First Year	Second Year	Third Year	ForthYear	Fifth Year
Rs. 80,000/-	Rs. 80,000/-	Rs. 80,000/-	Rs. 80,000/-	(Internship) No Tuition fees

(C) Duration of the Courses :-

I. The Bachelor of Optometry Degree program is of 5 years duration (4+1) including 1 years compulsory internship.

II. Academic schedule as approved by MUHS, Nashik.

(अनिल भंडारी)भा.प्र.से.
आयुक्त,
वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष

प्रति,

1 PBMA's H.V. Desai Eye Hospital, Hadapsar, Pune
2 Laxmi Charitable Trust, Laxmi college of Optometry, Panvel
3 Lotus Hospitals Trust Lotus College of Optometry, Juhu, Mumbai

4 Mahyco Research Foundation Trust, Shri Ganapati Netralaya College of Optometry, Jalna

5 Maharashtra Institute of Optometry, BSc Optometry & Diploma in Optometry college, Latur

6 Smt. Indirabai Wavikar Charitable Trust, Wavikar College of Optometry, Majiwade, Thane

7 Nandadeep Eye Hospital, Nandadeep School of Optometry, Sangli

8 Sant Gajanan Maharaj College of Optometry, Mahagaon, Tal, Gadhinglaj, Dist. Kolhapur

9 Yashodeep BahuUddeshiya Samajik Shaikshanik Sanstha's Dr. Shivajirao Ghogare Optometry Institute, Osmanabad.

10 Netradeep college of optometry, Beed.

11 Maharashtra University of Health Sciences (MUHS), Aurangabad.

12 Birla College of Optometry, College of Optometry & Ophthalmic Sciences, Nashik .

13 Ankur Institute of Optometry & Ophthalmic Sciences, College of Optometry, Gadhinglaj, Kolhapur

14 Dudhabhate Healthcare Private Limited, Wadgaon (BK), Pune

प्रत,

कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, दिंडोरी रोड, नाशिक

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK
दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक - ४२२००४ Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004
Tel :(0253) 25392230/228 (UG), 25392232 (PG), Fax : (0253)2539231/33
Student Helpline : 0253-2539111/6659111/100
Website : www.muhs.ac.in, E-mail : eligibilitydental@muhs.ac.in

डॉ. राजेंद्र राजस शिवाजी बंगाळ
एम.बी.बी.एस, एम.डी.(न्यायवैद्यकशास्त्र),डी.एन.बी, एल.एल.बी.
कुलसचिव

Dr. Rajendra Rajas Shivaji Bangal
M.B.B.S, M.D. (Forensic Medicine), D.N.B, L.L.B.
Registrar

जा.क्र. मआविवि/सा. २/८२२६/२०२६ दिनांक २६/११/२०२६

अत्यंत महत्वाचे

प्रथम वर्ष बी.एस्सी. ऑप्टोमेट्री अभ्यासक्रमाचे नोंदणी व पात्रता परिपत्रक क्र. ५८/२०२६

प्रति,
मा.अधिष्ठाता / प्राचार्य,
विद्यापीठाशी संलग्नित बी.एस्सी. ऑप्टोमेट्री
अभ्यासक्रमाची महाविद्यालये .

विषय : शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये विद्यापीठाशी संलग्नित बी.एस्सी. ऑप्टोमेट्री अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या नोंदणी व प्रवेश पात्रतेबाबत...

संदर्भ :
१. विद्यापीठ अध्यादेश क्र.०२/२०२५.
२. विद्यापीठाची पात्रता अधिसुचना क्र.०१/२०२६ दिनांक ०७/०१/२०२६.
३. विद्यापीठ परित्रक क्र. मआविवि/सीओ/१२५०/२०२६ दिनांक २५/०८/२०२६.
४. आयुक्तालय, वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष मुंबई यांचे पत्र क्र. DMER-11011/38/2022-CETIT/2025 Date. 30/10/2026.
५. महाराष्ट्र शासन, वैद्यकीय शिक्षण विभाग, मुंबई यांचे पत्र क्र. संकिर्ण क्र-२०२६/प्र.क्र.०६/२६/शिक्षण-३, दिनांक १९/११/२०२६.
६.आयुक्तालय, वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष मुंबई यांचे पत्र क्र.आवैशिसवआ/बी.ऑप्टोमेट्री/प्रवेश परीक्षा/२०२६ दि.२०/११/२०२६.

महोदय / महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरुन सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये बी.एस्सी. ऑप्टोमेट्री अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेकरीता विद्यार्थ्यांचे नोंदणी व पात्रता प्रस्ताव विद्यापीठास सादर करण्याचा अंतिम दिनांक विद्यार्थी प्रवेश प्रक्रियेच्या अंतिम दिनांका नुसार निश्चित करण्यात येईल. उक्त विहित केलेल्या मुदतीपावेतो विद्यार्थ्यांचे प्रवेश करणे बंधनकारक असुन सदर मुदतीनंतर रिक्त जागेवर विद्यार्थी प्रवेशित करता येणार नाही. अंतिम प्रवेश दिनांकानंतर शिल्लक रिक्त जागेवर विद्यार्थी प्रवेशित केल्यास सदर प्रवेश अनियमित प्रवेश म्हणुन गणण्यात येतील. अंतिम प्रवेश दिनांकानंतर शिल्लक रिक्त जागा या शैक्षणिक वर्षाकरीता रिक्त समजण्यात येतील. विद्यापीठ अध्यादेश क्र. ०२/२०२५ नुसार शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांचे नोंदणी व प्रवेशपात्रतेचे प्रस्ताव योग्य त्या कागदपत्रांसह परिपुर्ण स्वरुपात विद्यापीठास सादर करण्याची जबाबदारी महाविद्यालयाचे अधिष्ठाता / प्राचार्य यांची असेल.

विद्यापीठाच्या C-DAC Online Automation Software मध्ये विद्यार्थ्यांची माहिती भरणेकरीता अवलंबवायची कार्यप्रणाली सोबत जोडली आहे. सदर कार्यप्रणालीप्रमाणे प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती Phase_I व Phase_II मध्ये विहित कालावधीत भरणे अनिवार्य आहे.

Scanned with OKEN Scanner

सदर अभ्यासक्रमाच्या अंतिम प्रवेश दिनांकानंतर अथवा विद्यापीठांकडून देण्यात आलेल्या अंतिम दिनांकानंतर कोणत्याही विद्यार्थ्यांची माहिती Automation Software वर भरता येणार नाही याची नोंद घ्यावी.

- शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये बी.एस्सी. ऑप्टोमेट्री अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांचे प्रवेश अर्ज C-DAC Online Automation Software मध्ये ऑनलाईन पध्दतीने सादर करणे अनिवार्य आहे.
- C-DAC Automation Software मध्ये विद्यार्थ्यांची माहिती भरण्याकरीता उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आयडी व पासवर्डच्या आधारेच विद्यार्थ्याच्या प्रवेशाबाबतची माहिती विद्यापीठाच्या https://automation.muhs.ac.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध प्रणालीमध्ये Academic Dept. मथळयाखाली College Desk या लिंक वर नोंदविणे आवश्यक आहे. (ज्या केंद्रांना पासवर्ड प्राप्त झाले नाहीत अशा केंद्रांनी खाली दिलेल्या क्रमांकावर संपर्क करावा.)
- ऑनलाईन पध्दतीने सादर केलेले पात्रता प्रवेश अर्ज वैध असतील व अशाच पध्दतीनेच सादर केलेले पात्रता प्रवेश अर्ज स्विकारले जातील. संगणक आज्ञावली हाताळणीकरीता सोबत दिलेल्या Step by Step Procedure for C-DAC Online Automation Software **(Annexure-A)** मध्ये नमूद सूचनांचा वापर करावा.
- सर्व महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांची नावे अचुक म्हणजेच एच. एस. सी. गुणपत्रकावर नमुद केल्याप्रमाणेच भरावेत विद्यार्थ्यांची नावे अचुक भरण्याची जबाबदारी महाविद्यालयाची असेल जेणेकरुन अंतिम नोंदणी व पात्रता मंजुर करतेवेळी नावाबाबत काहीही तक्रार उद् भवणार नाही.
- Phase_I मध्ये विद्यार्थ्यांची प्राथमिक माहिती अंतिम प्रवेश दिनांकापूर्वी **(दिनांक ३०/११/२०२६ रोजीपर्यंत)** भरणे तसेच अद्ययावत करता येईल. तदनंतर , कुठल्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांची माहिती भरता येणार नाही, याची नोंद घ्यावी. **Phase_I मध्ये विद्यार्थ्यांची केवळ प्राथमिक माहिती भरण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांचे स्कॅन प्रमाणपत्रे अपलोड करण्याची आवश्यकता नाही.**
- **प्रवेश बंद दिनांक रोजी पर्यंतचे महाविद्यालयाने ऑनलाईन पध्दतीने नोंदविलेली प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी हीच अंतिम यादी समजण्यात येईल. सदर विद्यार्थ्यांची यादी प्राचार्य / अधिष्ठाता यांच्या स्वाक्षरीनिशी दि. ०१/१२/२०२६ रोजी मध्यान्ह १२ वाजेपावेतो विद्यापीठाच्या (eligibilitydental@muhs.ac.in) येथे ई-मेलद्वारे पाठविण्यात यावी.**
- C-DAC Automation Software मध्ये विद्यार्थ्याची प्राथमिक माहिती जसे की, विद्यार्थ्याचे नाव, प्रवेश दिनांक, विद्यार्थ्याचा मोबाईल पत्ता, ई-मेल आयडी, प्रवर्ग (Category) उपप्रवर्ग (Sub-Category) राष्ट्रीयत्व इ. माहिती Selection Letter नुसार अचुक भरणे अनिवार्य आहे.
- Phase_II मध्ये महाविद्यालय / परिसंस्था / संस्था /रुग्णालय यांनी विद्यार्थ्यांचे आवश्यक असलेली स्कॅन दस्ताऐवज (Scan Documents) अंतिम प्रवेश दिनांकापासून २१ दिवसाच्या आत अपलोड करावे. विद्यार्थ्यांची ऑनलाईन माहिती भरणे व दस्तऐवजांची स्कॅन कॉपी ऑनलाईन अपलोड करण्याची जबाबदारी महाविद्यालय / परिसंस्था / संस्था /रुग्णालयाची असेल.
- शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासुन C-DAC ऑटोमेशन प्रणालीद्वारे विद्यार्थ्याची माहिती भरुन घेण्यात येवुन सर्व आवश्यक व अनिवार्य असलेली मुळ कागदपत्राच्या स्कॅन प्रती अपलोड करुन घेण्यात येत असल्याने प्रवेश नोंदणी व पात्रता प्रस्तावासोबत **विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती सादर करण्याची आवश्यकता नाही.**
- मुळ प्रमाणपत्राची दुय्यम (Duplicate) प्रत प्रस्तावासोबत जोडली असल्यास मुळ प्रमाणपत्र देणाऱ्या प्राधिकरणांकडुन त्याबाबतचे पडताळणी पत्र सादर करावे अथवा मुळ प्रमाणपत्र गहाळ झालेले असल्यास त्याबाबतचे पोलीस विभागाचे एफ.आय.आर. व त्याबाबतचे प्रतिज्ञापत्र सादर करावे.
- महाराष्ट्र राज्याबाहेरील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या राज्यात जातवैधता प्रमाणपत्र देण्याची तरतूद नसेल अशा विद्यार्थ्यांच्या प्रस्तावासोबत **(Annexure-B)** नुसार प्रमाणपत्र सादर करण्यात यावे. आर्थिक दुर्बल घटक प्रवर्गाचा लाभ घेण्याऱ्या विद्यार्थ्यांनी वर्ष २०२६-२७ करीता सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेले प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

Scanned with OKEN Scanner

- अनुसूचित जाती व जमाती वगळता विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागासवर्ग, विशेष मागासवर्ग या संवर्गामध्ये प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांनी प्रगत व उन्नत गटात मोडत नसल्याबाबतचे वैध असलेले प्रमाणपत्र (नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र) सादर करणे अनिवार्य आहे. तसेच सदर प्रमाणपत्र दिनांक ३१/०३/२०२७ पावेतो वैध असावे.

- शासन निर्णय क्र. सीबीसी - १२९०-२३११६/प्र.क्र.३७८/मावक-५, दि. २४ ऑगस्ट, १९९५ अन्वये महाराष्ट्र राज्य शासनाद्वारे अनुज्ञेय राखीव सवंर्गातील शैक्षणिक लाभ केवळ महाराष्ट्र राज्यातील मुळ रहिवासी असलेल्या विद्यार्थ्यांना देय असतील. त्याअनुषंगाने महाराष्ट्र राज्याबाहेरील मुळ रहिवासी असलेल्या राखीव संवर्गातील विद्यार्थ्यांना आरक्षण तसेच शैक्षणिक लाभ देय असणार नाही.

- संगणक आज्ञावलीमध्ये अपलोड केलेले विद्यार्थ्यांचे दस्ताऐवज योग्य असल्याचे पडताळणी करुन ऑनलाईन प्रक्रियेने अर्ज भरण्याची कार्यवाही पुर्ण करावी. अपलोड केलेले स्कॅन दस्ताऐवज योग्य व वाचनीय असावेत. अपलोड केलेले दस्तऐवज अयोग्य व वाचनीय नसल्यास संबंधित विद्यार्थ्याची प्रोफाईल पुनःश्च महाविद्यालयास परत पाठविण्यात येईल, याची नोंद घेण्यात यावी.
- सर्व विद्यार्थ्यांची माहिती भरुन झालेनंतर प्रत्येक विद्यार्थ्यांच्या नावासमोर क्लिक करुन भरलेल्या अर्जाची प्रिंटआऊट काढुन घ्यावी. अशा प्रकारे सर्व विद्यार्थ्यांच्या अर्जाची प्रिंटआऊट काढुन विद्यार्थ्यांची स्वाक्षरी व अधिष्ठाता / प्राचार्य / संचालक / समन्वयक यांनी साक्षांकित केलेला विद्यार्थ्याचा पात्रता प्रवेश अर्ज व त्यासोबत विद्यार्थ्यांचे सर्व आवश्यक प्रमाणपत्र (**Annexure-C**) प्रस्तावासोबत जोडुन विद्यापीठास सादर करावा.
  - Annexure-C मधील कागदपत्राव्यतिरिक्त खालील नमुद मुळ कागदपत्रे प्राथमिक पडताळणी केल्यानंतर विद्यापीठ स्तरावर ठेवून घेण्यात येतील व उर्वरीत मुळ कागदपत्रे महाविद्यालयांच्या प्रतिनिधीकडे त्याच दिवशी परत करण्यात येतील. त्यामुळे खाली नमुद केलेली कागदपत्रे क्रमवारीनुसार तसेच Annexure-C मधील नमुद मुळ कागदपत्राव्यतिरिक्त वेगळा संच तयार करुन विद्यापीठास सादर करावा.
  - Online Application Form Printout, Migration Certificate and Online Payment Receipt of Eligibility and Registration Fees paid (Photostat Copy Attested by Dean / Principal)

- **Annexure-E** नुसार महाविद्यालयात एकूण प्रवेश क्षमता व प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती तसेच सदर विद्यार्थ्यांचे मूळ प्रमाणपत्र महाविद्यालय स्तरावर पडताळणी केलेले असल्याची माहिती मा.अधिष्ठाता/प्राचार्य/संचालक यांच्या स्वाक्षरी व शिक्क्यासह विद्यापीठास सादर करावे.
- शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता बी.एस्सी. ऑप्टोमेट्री अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांनी नोंदणी व प्रवेश पात्रता प्रस्ताव सादर करण्याबाबतचे वेळापत्रक स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल.
- महाविद्यालयाने विद्यार्थ्यांचे नोंदणी व पात्रता शुल्क जमा करुन विद्यापीठाच्या ऑनलाईन संकेतस्थळावर उपलब्ध Online Payment या मथळयाखाली Eligibility Department –Eligibility (UG) अथवा Eligibility (PG) (जे लागु असेल) जाऊन एकत्रित रक्कमेचा नोंदणी व पात्रता शुल्काचा भरणा करावा.
- महाविद्यालयाने नोंदणी व पात्रता शुल्काचा भरणा केलेल्या शुल्काची यादी C-DAC Automation Software मध्ये उपलब्ध असलेल्या Eligibility Fee Details येथे जाऊन प्रिंटआऊट घ्यावी. विद्यार्थी निहाय जमा केलेली रक्कम इ. नोंदणी पात्रता शुल्काचा तपशील असलेली यादी व भरणा पावतीची छायांकित प्रत प्रस्तावा सोबत सादर करावी.
- विद्यार्थ्यांना लागु असलेले नोंदणी व पात्रता शुल्क, विलंब शुल्क व विलंबाने त्रुटी पुर्तता करीता आकारण्यात येणारे शुल्क विद्यापीठ अधिसुचना क्र. **०१/२०२६** नुसार आकारणीय असेल. **(प्रत संलग्न)**
- मा. सर्वोच्च न्यायालय, मा. उच्च न्यायालय यांचे आदेश, केंद्र व राज्य शासनाचे निर्णय, नॅशनल कमिशन फॉर अलाईड अँड हेल्थकेअर प्रोफेशन्स (NCAHP), वैद्यकीय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई तसेच संबंधित सक्षम प्राधिकरणाद्वारे वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेले आदेश, सुचना, नियम, तसेच, विद्यापीठ नियमावलीतील नियम/तरतुदी इ. व

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अध्यादेश क्र.०२/२०२५ यास अनुसरुन या परिपत्रकातील नियम / तरतुदींनुसार विद्यार्थ्यांना नोंदणी व प्रवेश पात्रता प्रदान करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

- शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता ज्या महाविद्यालयास विद्यापीठाचे संलग्निकरण / संलग्निकरणाचे नुतनीकरण प्राप्त झाले अशा महाविद्यालयांचे नोंदणी व पात्रता प्रस्ताव विद्यापीठाद्वारे स्वीकारण्यात येतील याची नोंद घ्यावी.
- नोंदणी व पात्रता शुल्क विनापरतावा (Non-refundable) व अहस्तांतरणीय (Non-transferable) आहे.
- संकेतस्थळावर प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती भरताना संगणक आज्ञावलीसंबंधी काही अडचण उद्भवल्यास त्याबाबत खालील दिलेल्या तक्त्यातील विभाग प्रमुख व कक्ष प्रमुख पात्रता विभाग यांचेशी दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

श्री. आशिष बालोद, लिपिक	०२५३-२५३९२३०/६६५९२३०
श्री. प्रविण घाटेकर, सांख्यिकी अधिकारी	०२५३-२५३९३२१/६६५९३२१
डॉ. आर. टी. आहेर विशेष कार्य अधिकारी	०२५३-२५३९३१४/६६५९३१४
श्री. महेंद्र नि. कोठावदे, उपकुलसचिव, तथा विभाग प्रमुख	०२५३-२५३९२३३/६६५९२३३
C-DAC Support Team (संगणक प्रणाली मध्ये तांत्रिक अडचण उद् भवल्यास)	(८०८७९९५८८३, ९९६०६९७८८३) muhs.application.helpdesk@gmail.com)

महत्वाचे : १. संदर्भ क्र. ५ नुसार महाराष्ट्र शासन, वैद्यकीय शिक्षण विभाग यांनी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे, बी.एस्सी. ऑप्टोमेट्री अभ्यासक्रमाचे सर्व संस्थास्तरीय प्रवेश हे नॅशनल कमिशन फॉर अलाईड अँड हेल्थकेअर प्रोफेशन्स (NCAHP) यांनी निर्धारित केलेल्या प्रवेश क्षमतेचे निकष (किमान ३० व कमाल १००) तसेच वेळोवेळी निर्गमित केलेल्या तरतुदी, नियम व मानकांच्या अधीन राहूनच करण्यात यावेत.

२. संदर्भ क्र. ६ नुसार आयुक्तालय, वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष, मुंबई (DMER) यांनी निर्गमित केलेल्या सूचनेनुसारच पुढील प्रवेश प्रक्रिया राबविण्यात यावी.

३. विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाकडून शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता निर्गमित करण्यात आलेल्या नवीन संलग्नता नुतनीकरण पत्राप्रमाणेच (Continuation of Affiliation Letter) प्रवेश प्रक्रिया राबविणे बंधनकारक राहील.

Maharashtra University Of Health Sciences R.O. Nashik

26-11-26

कुलसचिव

कुलसचिव
महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,
नाशिक

26 NOV 2026

सोबत :- वरील प्रमाणे.

प्रत माहितीस्तव :- १. मा. कुलगुरु कार्यालय, म.आ.वि.वि., नाशिक
२. कुलसचिव कार्यालय, म.आ.वि.वि., नाशिक
३. विभागप्रमुख, शैक्षणिक विभाग

Scanned with OKEN Scanner